# RInfra–Generation (RInfra-G)

Executive Summary (Marathi):

Multi Year Tariff (MYT) Mid-Term Review Petition for the Control Period: FY 2012-13 to FY 2015-16

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

## अनुक्रमणिका

१. परिचय ..... ५

१.१. मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) याचिका सादर करण्याची पार्श्वभूमी ..... ५

१.२ बहुवार्षिक मध्यावधी पुनरावलोकन याचिकेचे उद्दिष्ट ..... ५

२. एटीई निकालांचा परिणाम ..... ६

२.१ माननीय एटीईचा निकाल – आयकरासाठी परवानगी ..... ६

२.२ माननीय एटीईचा निकाल – नमुनेदार कर्जांवरील व्याजाला परवानगी ..... ६

२.३ कॅरिंग कॉस्टसहित एकूण परिणाम ..... ७

३. आ.व. १२–१३चे ट्रूईंग अप ..... ७

३.१. प्रचालनात्मक कामगिरी ..... ७

३.२. इंधनाचा खर्च ..... ७

३.३. पीएलएफ इन्सेंटिव्ह ..... ८

३.४. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण ..... ८

३.५. डेट–इक्विटी गुणोत्तर ..... ८

३.६. घसारा ..... ८

३.७. खेळत्या भांडवलावरील व्याज ..... ८

३.८. कर्जाऊ भांडवलावरील व्याज ..... ९

३.९. इक्विटीवरील परतावा ..... ९

३.१०. प्रचालन आणि देखभाल खर्च ..... ९

३.११. आयकर ..... ९

३.१२. विजेच्या विक्रीपासून महसूल ..... ९

३.१३. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न (एनटीआय) ..... १०

३.१४. आ.व. २०१२–१३साठी ट्रूईंग अप ..... १०

4. आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अप ..... ११

४.१. प्रचालनात्मक कामगिरी ......... ११
४.२. इंधनाचा खर्च ......... ११
४.३. पीएलएफ इन्सेंटिव्ह ......... ११
४.४. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण ......... ११
४.५. डेट–इक्विटी गुणोत्तर ......... १२
४.६. घसारा ......... १२
४.७. खेळत्या भांडवलावरील व्याज ......... १२
४.८. कर्जाऊ भांडवलावरील व्याज ......... १२
४.९. इक्विटीवरील परतावा ......... १२
४.१०. प्रचालन आणि देखभाल खर्च ......... १२
४.११. आयकर ......... १३
४.१२. विजेच्या विक्रीपासून महसूल ......... १३
४.१३. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न (एनटीआय) ......... १३
४.१४. आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अप ......... १३
५. आ.व. २०१४–१५च्या वार्षिक कामगिरीचे पुनरावलोकन (एपीआर) ......... १४
५.१. प्रचालनात्मक कामगिरी ......... १४
५.२. इंधनाचा खर्च ......... १४
५.३. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण ......... १४
५.४. डेट–इक्विटी गुणोत्तर ......... १५
५.५. घसारा ......... १५
५.६. खेळत्या भांडवलावरील व्याज ......... १५
५.७. कर्जाऊ भांडवलावरील व्याज ......... १५
५.८. इक्विटीवरील परतावा ......... १५
५.९. प्रचालन आणि देखभाल खर्च ......... १५

५.१०. आयकर ....... १६

५.११. प्रचलित दरपत्रकापासून महसूल ....... १६

५.१२. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न (एनटीआय) ....... १६

५.१३. आ.व. २०१४-१५साठी तात्पुरते ट्रूइंग अप ....... १६

६. आ.व. २०१५-१६ची वार्षिक महसुलाची आवश्यकता(एआरआर) ....... १७

६.१. प्रचालनात्मक कामगिरी ....... १७

६.१.१. उपलब्धता आणि पीएलएफ ....... १७

६.१.२. इतर खप आणि निव्वळ निर्मिती ....... १७

६.१.३. वहनातील तोटा ....... १७

६.१.४. दुय्यम तेलाचा खप ....... १७

६.१.५. केंद्र उष्णता दर ....... १७

६.२. इंधनाचा खर्च ....... १८

६.३. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण ....... १८

६.४. डेट-इक्विटी गुणोत्तर ....... १८

६.५. घसारा ....... १८

६.६. खेळत्या भांडवलावरील व्याज ....... १८

६.७. कर्जाऊ भांडवलावरील व्याज ....... १९

६.८. इक्विटीवरील परतावा ....... १९

६.९. प्रचालन आणि देखभाल खर्च ....... १९

६.१०. आयकर ....... १९

६.११. प्रचलित दरपत्रकापासून महसूल ....... १९

६.१२. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न ....... १९

६.१३. आ.व. २०१५-१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता ....... २०

६.१४. आ.व. २०१५-१६साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता ....... २०

६.१५. आ.व. २०१५-१६साठी दरपत्रकाचा प्रस्ताव ....... २१

## तक्त्यांची सूची

तक्ता १: आ.व. २०१२–१३साठी ट्रूईंग अपचा सारांश ........ १०

तक्ता २: आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अपचा सारांश ........ १३

तक्ता ३: आ.व. २०१४–१५साठी महसुलातील तात्पुरती तफावत ........ १६

तक्ता ४: आ.व. २०१५–१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (कोटी रुपयांमध्ये) ........ २०

तक्ता ५: एकत्रित महसुलाची आवश्यकता ........ २०

तक्ता ६: आ.व. २०१५–१६साठी प्रस्तावित दरपत्रक ........ २१

## १. परिचय

### १.१ मध्यावधी पुनरावलोकन (एमटीआर) सादर करण्याची पार्श्वभूमी

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (यानंतर माननीय आयोग/माननीय मविनिआ असा उल्लेख केलेला आहे), त्यांना विद्युत कायदा, २००३च्या कलम ४५(२), ६१ व ६२ आणि त्यासोबत कलम १८१च्या सहवाचनांतर्गत बहाल केलेल्या अधिकारांच्या अंतर्गत ४ फेब्रुवारी २०११ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवार्षिक दरपत्रक) नियमावली, २०११ जारी केली (यानंतर जिचा उल्लेख एमवायटी नियमावली असा केला आहे). माननीय आयोगाने २०११चे प्रकरण क्रमांक ४५मध्ये दिलेल्या आदेशानुसार ही नियमावली रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडसाठी (यानंतर आरइन्फ्रा असा उल्लेख केलेला आहे) आ.व. १२–१३ पासून पुढे लागू करण्यात आली.

आरइन्फ्रा–जीने २०१३च्या प्रकरण क्र. १ अंतर्गत बहुवार्षिक याचिका दाखल केली, यात आरइन्फ्रा–जीने आ.व. १२–१३ ते आ.व. १५–१६ या कालावधीसाठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेला मंजुरी अपेक्षिलेली आहे. माननीय आयोगाने दिनांक १३ जून २०१३ रोजी सदरच्या प्रकरणात आ.व. १२–१३ ते आ.व. १५–१६ या कालावधीसाठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेला मंजुरी दिली.

सदरच्या आदेशात माननीय आयोगाने असा निकाल दिला की, आयोग आ.व. १४–१५च्या तिसऱ्या तिमाहीच्या दरम्यान आरइन्फ्रा–जीच्या कामगिरीचे मध्यावधी पुनरावलोकन करील आणि आरइन्फ्रा–जीला मध्यावधी पुनरावलोकनासाठी याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले.

### १.२ बहुवार्षिक मध्यावधी पुनरावलोकन याचिकेचे उद्दिष्ट

वरील अनुषंगाने सध्याची मध्यावधी पुनरावलोकन याचिका आरइन्फ्रा–जीद्वारे सादर केली जात आहे.

मागील कालावधीसाठीची, म्हणजेच आ.व. १२–१३ आणि आ.व. १३–१४ साठीची वास्तविक आकडेवारी आणि नियंत्रण कालावधीतील उर्वरित कालावधीसाठीचे म्हणजेच आ.व. १४–१५ आणि आ.व. १५–१६ साठीचे सुधारित अंदाज यासोबतच माननीय आयोगाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत. सध्याच्या या याचिकेत माननीय विद्युत अपीलीय न्यायाधिकरणाच्या (माननीय एटीई) विविध निकालांच्या परिणामस्वरूपी देय असलेल्या मागील काळातील खर्चांची वसुलीही त्यांच्यासोबतच्या कॅरिंग कॉस्टसहित समाविष्ट आहे.

## २. एटीई निकालांचा परिणाम

### २.१ माननीय एटीईचा निकाल – आयकरासाठी परवानगी

आरइन्फ्रा–जी ट्रूईंग अप करताना नफ्यावरील/तोट्यावरील आयकराची गणना स्टँड अलोन आधारे करपूर्व निश्चित करीत असते (म्हणजेच नियामक उत्पन्न वजा नियामक खर्च). माननीय आयोगाने २०११च्या प्रकरण क्र. १६३मध्ये दिनांक १६ मे २०१२ रोजी दिलेल्या आपल्या निकालात आरइन्फ्राने कंपनीसाठी आरइन्फ्राच्या निर्मिती, पारेषण आणि वितरण या नियामक व्यवसायांसहित विविध व्यवसायांसाठी संबंधित त्या–त्या खात्यांतर्गत त्या प्रमाणात भरणा केलेल्या वास्तविक संपूर्ण आयकराला परवानगी देत आ.व. ०९–१० ते आ.व. ११–१२ साठी आयकराला मान्यता दिली होती.

सदरच्या आदेशाला माननीय एटीईसमोर २०१२च्या अपील क्र. १३८ अन्वये आव्हान देण्यात आले होते. माननीय एटीईने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी निकाल जारी केला, ज्यात माननीय एटीईने माननीय आयोगाला स्टँड–अलोनच्या आधारे आयकराचे पुनर्निर्धारण करण्याचा आदेश दिला होता.

या निकालाच्या आधारे, आव. ०९–१० ते आ.व. ११–१२ साठीचा आयकर या याचिकेत पुनर्निर्धारित करण्यात आलेला आहे आणि त्याच्या होणाऱ्या अतिरिक्त परिणामाची गणना केलेली आहे.

### २.२ माननीय एटीईचा निकाल – नमुनेदार कर्जांवरील व्याजाला परवानगी

आरइन्फ्रा–जीने आपल्या २०११च्या याचिका क्र. १६३मध्ये १ एप्रिल २०११ रोजीनुसार नमुनेदार कर्जांवर व्याजाची गणना करीत असताना, आ.व. ११–१२ दरम्यान विचारात घेतलेल्या ताज्या कर्जासोबतच, त्यावेळचे नमुनेदार दर त्यावेळी बाजारातील प्रचलित व्याजदर प्रतिबिंबित होतील अशा प्रकारे सुधारित करण्यासाठी माननीय आयोगाकडे परवागनी मागितली होती.

तथापि, माननीय आयोगाने दिनांक १६ मे २०१२ रोजी २०११च्या प्रकरण १६३मध्ये दिलेल्या निकालात बाजारातील प्रचलित व्याजदरांनुसार मागील कर्जांचे व्याजदर सुधारित करण्याची विनंती विचारात घेतली नाही आणि आपल्या मागील आदेशांनुसार फक्त नमुनेदार व्याजदरांस मान्यता दिली.

सदर आदेशाला आरइन्फ्रा–जीने माननीय एजीईकडे २०१२च्या अपील क्र. १३८ द्वारे आव्हान दिले होते. माननीय एटीईने दिनांक २ डिसेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात माननीय एजीईने माननीय आयोगाला बाजारातील प्रचलित दर विचारात घेण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार, दिनांक १ एप्रिल २०११ रोजीनुसार बाकी असलेल्या सर्व नमुनेदार कर्जांवरील बाजारपेठेत प्रतिबिंबित झालेले व्याजदर ११.५०% (आ.व. ११–१२मध्ये घेतलेल्या ताज्या नमुनेदार कर्जांसाठी माननीय आयोगाने मान्यता दिलेले व्याजदर) एवढे विचारात घेतलेले आहेत. आणि आ.व. ११–१२साठीच्या व्याजदरांची पुन्हा गणना केलेली आहे.

### २.३ कॅरिंग कॉस्टसहित एकूण परिणाम

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, माननीय एटीईच्या निकालाच्या परिणामस्वरूपी असलेली वर उल्लेख केलेल्या मुद्दल रकमेला माननीय आयोगाना दिनांक १५ फेब्रुवारी २०११ रोजी २००९च्या अपील क्र. १७३मध्ये निकाल दिल्यानुसार कॅरिंग कॉस्ट सोबत परवानगी द्यावी. वर उल्लेख केलेल्या दोन बाबींच्या अतिरिक्त परिणामांचा दावा आरइन्फ्रा–जी संबंधित एसबीएआर(स्टेट बँक ॲडव्हान्स रेट) दराने कॅरिंग कॉस्टसह या याचिकेत करीत आहे. आ.व. १५–१६च्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत २६५.१५ कोटी रुपयांचा निव्वळ परिणाम वसुलीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

## ३. आ. व. १२–१३चे ट्रूईंग अप

या याचिकेत आरइन्फ्रा–जी लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे आ.व. १२–१३साठी करण्यात आलेला वास्तविक खर्च आणि प्राप्त केलेला महसूल ट्रूईंग अपसाठी सादर करीत आहे. आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला आ.व. १२–१३साठी ट्रूईंग अप करण्याची विनंती करीत आहे.

### ३.१. प्रचालनात्मक कामगिरी

आरइन्फ्रा–जीने ४,३८१.७५ एम यू (ढोबळ) विजेची निर्मिती १०१.०४% पीएलएफ दराने केलेली आहे आणि आ.व. २०१२–१३साठी ९६.६७% एवढी उपलब्धता कायम राखलेली आहे, जी मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये दिलेल्या मापदंडांपेक्षा बरीच अधिक आहे.

**खर्च**

### ३.२. इंधनाचा खर्च

आ.व. २०१२–१३मध्ये केलेला इंधनावरील वास्तविक खर्च १०६७.७९ कोटी रुपये एवढा आहे, परंतु मविनिआ एमवायटी नियमावली, २०११ अनुसार नमुनेदार निकषांवर आधारित गणना केलेला इंधनावरील खर्च १,१२७.४६ कोटी रुपये एवढा आहे. या दोहोंमधील फरक कार्यक्षमता लाभ म्हणून ओळखला जातो, कारण कमी खर्च हा केवळ निर्मितीकेंद्रांच्या उत्तम प्रचालनात्मक कार्यक्षमतेमुळे होत असतो. या नियमावलीनुसार, अशा प्रकारे गणना केलेल्या कार्यक्षमता लाभापैकी १/३ लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचविला जातो आणि विद्युतनिर्मिती केंद्रांना उर्वरित २/३ लाभ

स्वत:कडे ठेवण्याचा हक्क असतो, म्हणजेच डीटीपीएस १०६७.७९ कोटी रुपये एवढ्या बदलत्या खर्चास आणि ११२७.४६ कोटी रुपये आणि १०६७.७९ कोटी रुपये यांमधील २/३ फरकास पात्र ठरते.

### ३.३. पीएलएफ इन्सेंटिव्ह

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ४९.८ मध्ये कोळशावर आधारित औष्णिक विद्युतनिर्मिती केंद्रांनी नियमावलीतील विनिर्दिष्ट मापदंडांपेक्षा उच्च पीएलएफ प्राप्त केल्यास इन्सेंटिव्ह देण्याची तरतूद आहे. आ.व. २०१२–१३मध्ये आरइन्फ्रा–जीने १०१.०४% एवढे पीएलएफ प्राप्त केले, ज्याच्या परिणामस्वरूपी पीएलएफ इन्सेंटिव्ह १७.५८ कोटी रुपये एवढे येते.

### ३.४. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आ.व. २०१२–१३साठीचे भांडवलीकरण, बांधकामाच्या दरम्यानच्या व्याजासहित ३७.७९ कोटी रुपये एवढे आहे. माननीय आयोगाने २०१३च्या प्रकरण क्र. १मध्ये दिनांक १३ जून २०१३ रोजी एमवायटी आदेश देताना, याचिकाकर्त्यांनी एमवायटी दरपत्रकाच्या प्रक्रियेदरम्यान सादर केलेल्या तात्पुरत्या अलेखापरीक्षित हिशेबांच्या तपशिलाच्या आधारे ३५.९६ कोटी रुपये एवढ्या भांडवलीकरणास मान्यता दिलेली आहे.

### ३.५. डेट–इक्विटी गुणोत्तर

आ.व. १२–१३मध्ये विद्युतनिर्मिती व्यवसायात कोणत्याही प्रकारचे वास्तविक कर्ज घेतलेले नाही. म्हणून आरइन्फ्रा–जीने, आ.व. २०१२–१३साठी इक्विटीवरील परताव्याची आणि कर्जावरील व्याजाची गणना करण्यासाठी भांडवली खर्चाच्या योजनांचा नमुनेदार निधीपुरवठा ७०:३० या प्रमाणात विचारात घेतलेला आहे.

### ३.६. घसारा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये वेगवेगळ्या मालमत्तांवरील घसाऱ्याच्या दरांसहित घसाऱ्याचे कोष्टक दिलेले आहे. त्यात स्पष्ट केलेले आहे की, वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मालमत्तांवरील घसाऱ्याची गणना ज्या तारखेस या मालमत्तेची भर पडली, त्या वास्तविक तारखेचा उपयोग करून केली जाते आणि कोणत्याही मालमत्तेवर तिच्या ऐतिहासिक मूल्यावर ९०%पेक्षा अधिक घसाऱ्याचा दावा केला जात नाही. या व्यतिरिक्त, आमचे असे म्हणणे आहे की, मूळ जीएफएच्या ७०%च्या वर गेलेल्या मालमत्तेसाठीच्या घसाऱ्याच्या बाबतीत, उर्वरित ९०%पर्यंतचा घसारा मविनिआ एमवायटी नियमावली, २०११ नुसार त्यांच्या उर्वरित उपयुक्त आयुर्मानावर समप्रमाणात वाटलेले आहे.

### ३.७. खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने खेळत्या भांडवलावलाची आवश्यकता आणि त्यावरील व्याजाची गणना मविनिआ एमवायटी नियमावलली, २०११मधील विनियम ३५.१ नुसार केलेली आहे. या विनियमानुसार आरइन्फ्रा–जीने आ.व. २०१२–

१३साठी दिनांक १ एप्रिल २०१२ रोजी प्रचलित असलेला १४.७५% एवढा भारतीय स्टेट बँकेचा अग्रीम दर (एसबीएआर) विचारात घेतलेला आहे.

### ३.८. कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, माननीय आयोगाने एमवायटी दरपत्रक जारी करताना, कंपनीच्या (म्हणजेच आरइन्फ्राच्या) दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलासाठीचा वेटेड सरासरी व्याजदर एकूणच ८.७८% एवढा गणलेला आहे. या याचिकेतील ट्रूईंग अपसाठी आरइन्फ्रा–जीने वेटेड सरासरी व्याजदर हा आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डीसाठी एकत्रितपणे गणलेला असून तो आरइन्फ्रा–जीच्या नमुनेदार कर्जावर लागू केलेला आहे.

### ३.९. इक्विटीवरील परतावा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.१मध्ये दरसाल १५.५% दराने, त्या–त्या वर्षाच्या सुरुवातीच्या इक्विटी बेसवर, समभाग भांडवलावरील परताव्याजी तरतूद आहे. हीच पद्धत अवलंबून आरइन्फ्राने आ.व. १२–१३च्या अनुज्ञेय सुरुवातीच्या इक्विटी बेसवरील परताव्याची गणना या याचिकेत विचारात घेतल्यानुसार केलेली आहे.

### ३.१०. प्रचालन आणि देखभाल खर्च

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आव. २०१२–१३मध्ये केलेला प्रचालन आणि देखभालीवरील वास्तविक खर्च, माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या १२४.७३ कोटी रुपयांच्या तुलनेत १२४.५९ कोटी रुपये आहे:

एमवायटी नियमावली, २०११ नुसार १४ लाख रुपये एवढा कार्यक्षमता लाभ (नमुनेदार अनुज्ञेय खर्चापेक्षा वास्तविक खर्च कमी असल्याने) ग्राहकांकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

### ३.११. आयकर

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी आ.व. २०१२–१३साठीचा आयकर माननीय एटीईच्या निकालानुसार, उत्पन्न वजा अनुज्ञेय खर्च या तत्त्वावर गणलेला आहे.

## महसूल

### ३.१२. विजेच्या विक्रीपासून महसूल

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, विजेच्या विक्रीपासून प्राप्त झालेला महसूल १३६१.६६ कोटी रुपये एवढा आहे.

### ३.१३. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न (एनटीआय)

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, आ.व. २०१२–१३मध्ये प्राप्त दरपत्रकाव्यतिरिक्तचे एकूण उत्पन्न, माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या १५.९२ कोटी रुपये एवढ्या एनटीआयच्या तुलनेत २०.२६ कोटी रुपये एवढे आहे.

### ३.१४. आ.व. २०१२–१३साठी ट्रूइंग अप

आरइन्फ्रा–जी आ.व. २०१२–१३साठी ट्रूइंग अपचा सारांश पुढील तक्त्यात सादर करीत आहे:

**तक्ता १: आ.व. २०१२–१३साठी ट्रूइंग अपचा सारांश** (रू.कोटी)

| तपशील | आ.व. २०१२–१३ | | |
|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | विनियमकानुसार नक्त हक्कदारी | वास्तविक |
| **खर्च** | | | |
| *इंधनाशी संबंधित खर्च* | | *८४६.९३* | |
| *इंधनाच्या किमतीतील बदलांसाठी एफएसी* | | *२८०.५३* | |
| इंधनाशी संबंधित एकूण खर्च | ११२५.६१ | ११२७.४६ | १०६७.७९ |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १२४.७३ | १२४.७३ | १२४.५९ |
| घसारा | २०.९१ | २०.९१ | २१.११ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १५.६८ | १५.६८ | २१.३५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.४२ | १६.४२ | १५.९१ |
| आयकर | ०.०० | ०.०० | ३०.८६ |
| **एकूण खर्च (अ)** | **१,३०३.३६** | **१,३०५.२०** | **१,२८१.६१** |
| इक्विटीवरील परतावा | ८३.३० | ८३.३० | ८४.०० |
| *अधिक: उच्च पीएलएफसाठी इन्सेंटिव्ह* | ०.०० | ०.०० | १७.५९ |
| *अधिक: इंधनाच्या खर्चावरील २/३ कार्यक्षमता लाभ* | ०.०० | ०.०० | ३९.७८ |
| *अधिक: प्रचालन आणि देखभाल खर्चावरील २/३ कार्यक्षमता लाभ* | ०.०० | ०.०० | ०.०९ |
| **एकूण इक्विटीवरील परतावा+लाभ+इन्सेंटिव्ह(ब)** | **८३.३०** | **८३.३०** | **१४१.४७** |
| महसूल | | | |
| विजेच्या विक्रीपासून महसूल | १३०३.६७ | १३७२.५८ | १३६१.६६ |
| इतर उत्पन्न | १५.९१ | १५.९२ | २०.२६ |
| **एकूण महसूल (क)** | **१,३१९.५८** | **१,३८८.५०** | **१,३८१.९१** |
| **महसुलातील तफावत=(क)- [(अ)+(ब)]** | **(६७.०८)** | | **(४१.१७)** |

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, आ.व. १२–१३साठी माननीय आयोगाने मान्यता दिलेली महसुलातील तफावत/अधिक्य आ.व. २०१५–१६च्या महसुलातून वसूल करता येईल, ज्याच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत ते वसुलीसाठी जोडलेले आहे. त्यानंतर, आ.व. २०१२–१३च्या महसुलातील तफावतीवरही माननीय एटीईने २०१०च्या अपील क्र. २०२ आणि २०३मध्ये दिलेल्या निकालात घालून दिलेल्या तत्त्वांनुसार कॅरिंग कॉस्ट लावलेली असेल.

## ४. आ. व. १३–१४चे ट्रूईंग अप

या याचिकेत आरइन्फ्रा–जी लेखापरीक्षित हिशेबांच्या आधारे आ.व. १३–१४साठी करण्यात आलेला वास्तविक खर्च आणि प्राप्त केलेला महसूल ट्रूईंग अपसाठी सादर करीत आहे. आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला आ.व. १३–१४साठी ट्रूईंग अप करण्याची विनंती करीत आहे

### ४.१. प्रचालनात्मक कामगिरी

आरइन्फ्रा–जीने ४,१०९.२० एम यू (ढोबळ) विजेची निर्मिती ९४.५७% पीएलएफ दराने केलेली आहे आणि आ.व. २०१३–१४साठी ९५.८७% एवढी उपलब्धता कायम राखलेली आहे, जी मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये दिलेल्या मापदंडांपेक्षा बरीच अधिक आहे.

**खर्च**

### ४.२. इंधनाचा खर्च

आ.व. २०१३–१४मध्ये केलेला इंधनावरील वास्तविक खर्च १०४३.५१ कोटी रुपये एवढा आहे, परंतु मविनिआ एमवायटी नियमावली, २०११ अनुसार नमुनेदार निकषांवर आधारित गणना केलेला इंधनावरील खर्च १,०८८.७७ कोटी रुपये एवढा आहे. या दोहोंमधील फरक कार्यक्षमता लाभ म्हणून ओळखला जातो, कारण कमी खर्च हा केवळ निर्मितीकेंद्रांच्या उत्तम प्रचालनात्मक कार्यक्षमतेमुळे होत असतो. या नियमावलीनुसार, अशा प्रकारे गणना केलेल्या कार्यक्षमता लाभापैकी १/३ लाभ एमवायटी नियमावली, २०११मधील अटींनुसार ग्राहकांपर्यंत पोहोचविला जातो आणि विद्युतनिर्मिती केंद्रांना उर्वरित २/३ लाभ स्वत:कडे ठेवण्याचा हक्क असतो, म्हणजेच डीटीपीएस १०४३.५१ कोटी रुपये एवढ्या बदलत्या खर्चास आणि १,०८८.७७ कोटी रुपये आणि १०४३.५१ कोटी रुपये यांमधील २/३ फरकास पात्र ठरते.

### ४.३. पीएलएफ इन्सेंटिव्ह

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ४९.८ मध्ये कोळशावर आधारित औष्णिक विद्युतनिर्मिती केंद्रांनी नियमावलीतील विनिर्दिष्ट मापदंडांपेक्षा उच्च पीएलएफ प्राप्त केल्यास इन्सेंटिव्ह देण्याची तरतूद आहे. आ.व. २०१३–१४मध्ये आरइन्फ्रा–जीने ९४.५७% एवढे पीएलएफ प्राप्त केले, ज्याच्या परिणामस्वरूपी पीएलएफ इन्सेंटिव्ह १७.३१ कोटी रुपये एवढे येते.

### ४.४. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आ.व. २०१३–१४साठीचे भांडवलीकरण, बांधकामाच्या दरम्यानच्या व्याजासहित ११.९५ कोटी रुपये एवढे आहे. माननीय आयोगाने २०१३च्या प्रकरण क्र. १मध्ये दिनांक १३ जून २०१३ रोजी

एमवायटी आदेश देताना, याचिकाकर्त्यांनी एमवायटी दरपत्रकाच्या प्रक्रियेदरम्यान सादर केलेल्या तात्पुरत्या अलेखापरीक्षित हिशेबांच्या तपशिलाच्या आधारे १८४.०२ कोटी रुपये एवढ्या भांडवलीकरणास मान्यता दिलेली आहे.

### ४.५. डेट–इक्विटी गुणोत्तर

आ.व. १३–१४मध्ये विद्युतनिर्मिती व्यवसायात कोणत्याही प्रकारचे वास्तविक कर्ज घेतलेले नाही. म्हणून आरइन्फ्रा–जीने, आ.व. २०१३–१४साठी इक्विटीवरील परताव्याची आणि कर्जावरील व्याजाची गणना करण्यासाठी भांडवली खर्चाच्या योजनांचा नमुनेदार निधीपुरवठा ७०:३० या प्रमाणात विचारात घेतलेला आहे.

### ४.६. घसारा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये वेगवेगळ्या मालमत्तांवरील घसाऱ्याच्या दरांसहित घसाऱ्याचे कोष्टक दिलेले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, नियमावलीनुसार घसारा काढलेला केलेली आहे आणि त्याची गणना आ.व. २०१३–१४च्या जीएफएच्या मूळ पातळीवर तसेच वर्षभरात भर घातलेल्या मालमत्तेच्या आधारे केलेली आहे.

### ४.७. खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने खेळत्या भांडवलावलाची आवश्यकता आणि त्यावरील व्याजाची गणना मविनिआ एमवायटी नियमावलली, २०११मधील विनियम ३५.१ नुसार केलेली आहे. या नियमावलीनुसार आरइन्फ्रा–जीने आ.व. २०१३–१४साठी प्रचलित असलेला १४.४५% एवढा भारतीय स्टेट बँकेचा अग्रीम दर (एसबीएआर) विचारात घेतलेला आहे.

### ४.८. कर्जाऊ भांडवलावरील व्याज

या याचिकेतील ट्रूईंग अपसाठी आरइन्फ्रा–जीने वेटेड सरासरी व्याजदर हा वितरण व्यवसाय आणि पारेषण व्यवसाय यांच्यासाठी बाकी असलेले वास्तविक येणे कर्ज एकत्रितपणे करून त्यावर गणलेला असून तो आरइन्फ्रा–जीच्या नमुनेदार कर्जावर लागू केलेला आहे.

### ४.९. इक्विटीवरील परतावा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.१मध्ये दरसाल १५.५% दराने, त्या–त्या वर्षाच्या सुरुवातीच्या इक्विटी बेसवर, समभाग भांडवलावरील परताव्याजी तरतूद आहे. हीच पद्धत अवलंबून आरइन्फ्राने आ.व. १३–१४च्या अनुज्ञेय सुरुवातीच्या इक्विटी बेसवरील परताव्याची गणना या याचिकेत विचारात घेतल्यानुसार केलेली आहे.

### ४.१०. प्रचालन आणि देखभाल खर्च

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आव. २०१३–१४मध्ये केलेला प्रचालन आणि देखभालीवरील वास्तविक खर्च, माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या १३०.९६ कोटी रुपयांच्या तुलनेत १२९.२३ कोटी रुपये आहे. एमवायटी नियमावली, २०११ नुसार १.७३ कोटी रुपये एवढा कार्यक्षमता लाभ (नमुनेदार अनुज्ञेय खर्चापेक्षा वास्तविक खर्च कमी असल्याने) ग्राहकांकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

### ४.११. आयकर

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी आ.व. २०१३–१४साठीचा आयकर माननीय एटीईच्या निकालानुसार, उत्पन्न वजा अनुज्ञेय खर्च या तत्त्वावर गणलेला आहे.

## महसूल

### ४.१२. विजेच्या विक्रीपासून महसूल

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, विजेच्या विक्रीपासून प्राप्त झालेला महसूल १३२५.४० कोटी रुपये एवढा आहे.

### ४.१३. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न (एनटीआय)

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, आ.व. २०१३–१४मध्ये प्राप्त दरपत्रकाव्यतिरिक्तचे एकूण उत्पन्न, माननीय आयोगाने मान्यता दिलेल्या १६.७१ कोटी रुपये एवढ्या एनटीआयच्या तुलनेत १६.६१ कोटी रुपये एवढे आहे.

### ४.१४. आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अप

आरइन्फ्रा–जी आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अपचा सारांश पुढील तक्त्यात सादर करीत आहे:

**तक्ता २: आ.व. २०१३–१४साठी ट्रूईंग अपचा सारांश (रू. कोटी)**

| तपशील | आ.व. २०१३–१४ | | |
|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | विनियमकानुसार नक्त हक्कदारी | वास्तविक |
| **खर्च** | | | |
| *इंधनाशी संबंधित खर्च* | | १०२६.३४ | |
| *इंधनाच्या किमतीतील बदलांसाठी एफएसी* | | ६४.०९ | |
| इंधनाशी संबंधित एकूण खर्च | १०९२.०२ | १०८८.७७ | १०४३.५१ |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १३०.९६ | १३०.९६ | १२९.२३ |
| घसारा | २९.७७ | २९.७७ | २३.७५ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २०.२१ | २०.२१ | २०.२५ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.१५ | १६.१५ | १५.३६ |
| आयकर | ०.०० | ०.०० | २७.८६ |
| **एकूण खर्च** | **१,२८९.११** | **१,२८५.८६** | **१,२५९.९५** |
| अगोदरच्या वर्षातील महसुलातील तफावत | –११४.४४ | –११४.४४ | –११४.४४ |
| आ.व. १२–१३साठी महसुलातील तफावत | ६७.०८ | ६७.०८ | ६७.०८ |
| **एकूण खर्च (अ)** | **१,२४१.७५** | **१,२३८.५०** | **१,२१२.६०** |
| इक्विटीवरील परतावा | ८४.६४ | ८४.६४ | ८५.४२ |
| *अधिक: उच्च पीएलएफसाठी इन्सेंटिव्ह* | ०.०० | ०.०० | १७.३१ |
| *अधिक: इंधनाच्या खर्चावरील २/३ कार्यक्षमता लाभ* | ०.०० | ०.०० | ३०.१८ |
| *अधिक: प्रचालन आणि देखभाल खर्चावरील २/३ कार्यक्षमता लाभ* | ०.०० | ०.०० | १.१६ |
| **एकूण इक्विटीवरील परतावा+लाभ+इन्सेंटिव्ह(ब)** | **८४.६४** | **८४.६४** | **१३४.०७** |
| **महसूल** | | | |
| विजेच्या विक्रीपासून महसूल | १३०९.६८ | १३५३.७९ | १३२५.४० |
| इतर उत्पन्न | १६.७१ | १६.७१ | १६.६१ |
| **एकूण महसूल (क)** | **१,३२६.३९** | **१,३७०.५०** | **१,३४२.०१** |

| | | | |
|---|---|---|---|
| महसुलातील (तफावत)/अधिक्य=(क)–[(अ)+(ब)] | ०.० | | (४.६५) |

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, आ.व. १३–१४साठी माननीय आयोगाने मान्यता दिलेली महसुलातील तफावतआ.व. २०१५–१६च्या महसुलातून वसूल करता येईल, ज्याच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेत ते वसुलीसाठी जोडलेले आहे. त्यानंतर, आ.व. २०१३–१४च्या महसुलातील तफावतीवरही माननीय एटीईने २०१०च्या अपील क्र. २०२ आणि २०३ मध्ये दिलेल्या निकालात घालून दिलेल्या तत्त्वांनुसार कॅरिंग कॉस्ट लावलेली असेल.

## ५. आ.व. २०१४–१५च्या वार्षिक कामगिरीचे पुनरावलोकन (एपीआर)

या विभागात, आरइन्फ्रा–जी आ.व. २०१४–१५साठी, पहिल्या सहामाहीतील अलेखापरीक्षित वास्तविक आणि दुसऱ्या सहामाहीच्या अंदाजित आकडेवारीच्या आधारे तात्पुरते खर्च आणि महसूल सादर करीत आहे. आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला आ.व. १४–१५साठी ट्रूईंग अप करण्याची विनंती करीत आहे.

### ५.१. प्रचालनात्मक कामगिरी

आरइन्फ्रा–जीने २२१४.९६ एम यू (ढोबळ) विजेची निर्मिती १०२.०९% पीएलएफ दराने केलेली आहे आणि आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीत (म्हणजेच एप्रिल–सप्टेंबर) ९९.१२% एवढी उपलब्धता कायम राखलेली आहे, जी मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये दिलेल्या मापदंडांपेक्षा बरीच अधिक आहे. आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीतील कामगिरीप्रमाणेच आरइन्फ्रा–जी आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीसाठी (म्हणजेच ऑक्टोबर–मार्च) २,२१३.५४ एम यू आणि १०२.५२% पीएलएफ व त्यासोबत ९६.३६% उपलब्धतेचा अंदाज वर्तवीत आहे.

**खर्च**

### ५.२. इंधनाचा खर्च

आ.व. २०१४–१५च्या पहिल्या सहामाहीमध्ये केलेला इंधनावरील वास्तविक खर्च ५५१.९८ कोटी रुपये एवढा आहे, आणि आ.व. २०१४–१५च्या दुसऱ्या सहामाहीसाठी अंदाजित इंधनाचा खर्च ५३६.८४ कोटी रुपये आहे, म्हणजेच आ.व. २०१४–१५साठीचा एकूण खर्च १०७७.५ कोटी रुपये आहे.

### ५.३. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आ.व. २०१४–१५साठीचे अपेक्षित भांडवलीकरण ६३.७५ कोटी रुपये एवढे आहे. त्यांनी ही याचिका सादर करताना याआधीच ३७.३२ कोटी रुपयांचे भांडवलीकरण केलेले आहे आणि उर्वरित आ.व. २०१४–१५मध्ये बाकीचे भांडवलीकरण घडून येईल.

### ५.४. डेट–इक्विटी गुणोत्तर

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३१ मध्ये भांडवली खर्चासाठीच्या योजनांना ७०:३० या प्रमाणात डेट–इक्विटी गुणोत्तरानुसार निधीपुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे. आ.व. १४–१५मध्ये विद्युतनिर्मिती व्यवसायात भांडवली खर्चासाठी कोणत्याही प्रकारचे वास्तविक कर्ज घेतलेले नसल्याने आरइन्फ्रा–जीने, आ.व. २०१४–१५च्या ट्रूईंग अपसाठी इक्विटीवरील परताव्याची आणि कर्जावरील व्याजाची गणना करण्यासाठी भांडवली खर्चाच्या योजनांचा नमुनेदार निधीपुरवठा ७०:३० या प्रमाणात विचारात घेतलेला आहे.

### ५.५. घसारा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये वेगवेगळ्या मालमत्तांवरील घसाऱ्याच्या दरांसहित घसाऱ्याचे कोष्टक दिलेले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, नियमावलीनुसार घसारा काढलेला केलेली आहे आणि त्याची गणना आ.व. २०१४–१५च्या जीएफएच्या मूळ पातळीवर तसेच वर्षभरात भर घातलेल्या मालमत्तेच्या आधारे केलेली आहे.

### ५.६. खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने खेळत्या भांडवलावलाची आवश्यकता आणि त्यावरील व्याजाची गणना मविनिआ एमवायटी नियमावलली, २०११मधील विनियम ३५.१ नुसार केलेली आहे. या नियमावलीनुसार आरइन्फ्रा–जीने आ.व. २०१३–१४साठी प्रचलित असलेला १४.७५% एवढा भारतीय स्टेट बँकेचा अग्रीम दर (एसबीएआर) विचारात घेतलेला आहे.

### ५.७. कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आ.व. २०१४–१५मध्ये भांडवलीकरण केलेल्या मालमत्तांसाठी ७०:३० असे नॉरमेटिव्ह डेट:इक्विटी गुणोत्तर आरइन्फ्रा–जीने, मविनिआ एमवाटी नियमावली, २०११नुसार विचारात घेतलेले आहे. या याचिकेतील ट्रूईंग अपसाठी आरइन्फ्रा–जीने वेटेड सरासरी व्याजदर हा वितरण व्यवसाय आणि पारेषण व्यवसाय यांच्यासाठी बाकी असलेले वास्तविक येणे कर्ज एकत्रितपणे करून त्यावर गणलेला असून तो आरइन्फ्रा–जीच्या नमुनेदार कर्जावर लागू केलेला आहे.

### ५.८. इक्विटीवरील परतावा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ३२.१मध्ये दरसाल १५.५% दराने, त्या–त्या वर्षाच्या सुरुवातीच्या इक्विटी बेसवर, समभाग भांडवलावरील परताव्याजी तरतूद आहे. हीच पद्धत अवलंबून आरइन्फ्राने आ.व. १४–१५च्या अनुज्ञेय सुरुवातीच्या इक्विटी बेसवरील परताव्याची गणना या याचिकेत विचारात घेतल्यानुसार केलेली आहे.

### ५.९. प्रचालन आणि देखभाल खर्च

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आव. २०१४–१५मध्ये केलेला प्रचालन आणि देखभालीवरील वास्तविक खर्च, माननीय आयोगाने एमवायटी आदेशात मान्यता दिलेल्या १३७.५५ कोटी रुपयांच्या तुलनेत १३८.८२ कोटी रुपये आहे.

### ५.१०. आयकर

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी आ.व. २०१४–१५साठीचा आयकर आ.व. २०१३–१४च्या वास्तविक आयकरावर आधारित आणि एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३४.१नुसार २७.८६ कोटी रुपये एवढा अपेक्षित धरलेला आहे.

## महसूल

### ५.११. प्रचलित दरपत्रकानुसार महसूल

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, विजेच्या विक्रीपासून मिळणारा महसूल १४७४.०६ कोटी रुपये असेल असा अंदाज आहे.

### ५.१२. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, आ.व. २०१४–१५साठीचे एनटीआय १७.३८ कोटी रुपये असेल असा अंदाज आहे.

### ५.१३. आ.व. २०१४–१५साठी तात्पुरते ट्रूईंग अप

आ.व. २०१४–१५साठीचे तात्पुरते ट्रूईंग अप पुढीलप्रमाणे काढता येईल:

**तक्ता ३: आ.व. २०१४–१५साठी महसुलातील तात्पुरती तफावत (रू. कोटी)**

| तपशील | आ.व.२०१४–१५ | | |
|---|---|---|---|
| | एमवायटी आदेश | विनियमकानुसार नक्त हक्कदारी | अंदाजे |
| **खर्च** | | | |
| *इंधनाशी संबंधित खर्च* | | ११८५.५६ | |
| *इंधनाच्या किमतीतील बदलांसाठी एफएसी* | | –८.२१ | |
| इंधनाशी संबंधित एकूण खर्च | १११२.६५ | ११७७.३४ | १०७७.५० |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | १३७.५५ | १३७.५५ | १३८.८२ |
| घसारा | २९.५८ | २९.५८ | २७.१० |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २८.६१ | २८.६१ | १९.०६ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १६.७० | १६.७० | १६.०७ |
| आयकर | ०.०० | ०.०० | २७.८६ |
| **एकूण खर्च (अ)** | **१,३२५.०९** | **१,३८९.७८** | **१,३०६.३९** |
| इक्विटीवरील परतावा | ९३.११ | ९३.११ | ८५.८८ |
| अधिक: उच्च पीएलएफसाठी इन्सेंटिव्ह | ०.०० | ०.०० | ९.१९ |
| **एकूण इक्विटीवरील परतावा+लाभ+इन्सेंटिव्ह(ब)** | **९३.११** | **९३.११** | **९५.०७** |
| **महसूल** | | | |
| विजेच्या विक्रीपासून महसूल | १४००.६६ | १४६५.३५ | १४७४.५५ |
| इतर उत्पन्न | १७.५४ | १७.५४ | १७.३८ |
| **एकूण महसूल (क)** | **१,४१८.२०** | **१,४८२.८९** | **१,४९१.९२** |
| **महसुलातील (तफावत)/अधिक्य=(क)–[(अ)+(ब)]** | **०.००** | **०.००** | **९०.४६** |

आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की, कृपया वर उल्लेख केलेल्या आ.व. १४–१५साठीच्या महसुलाच्या तात्पुरत्या तफावतीस मान्यता देण्यात यावी.

## ६. आ.व. २०१५–१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (एआरआर)

या विभागात आरइन्फ्रा–जी, मागील कालावधीतील कामगिरीच्या आणि तिचा येत्या वर्षावर होणाऱ्या परिणामांच्या आधारे आ.व. २०१५–१६साठी सुधारित एआरआर सादर करीत आहे. आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की, आ.व. २०१५–१५च्या सुधारित एआरआरला मान्यता देण्यात यावी.

**तांत्रिक घटकांचा अंदाज**

### ६.१. प्रचालनात्मक कामगिरी

#### ६.१.१. उपलब्धता आणि पीएलएफ

आरइन्फ्रा–जीने ९५.९०% उपलब्धता विचारात घेतलेली आहे आणि १००% भाराचा विचार करीत आहे, आ.व. १५–१६मध्ये अंदाजित वीजनिर्मितीची गणना करण्यासाठी पीएलएफ ९५.९०% एवढाच विचारात घेतलेला आहे.

#### ६.१.२. इतर खप आणि निव्वळ निर्मिती

आरइन्फ्रा–जीने एफजीडीसाठीच्या इतर खपासहित आ.व. २०१५–१६साठी एकूण इतर खप ९.७१% एवढा विचारात घेतलेला आहे. प्रकल्पापासून ३८०२.८ एम यू एवढी निर्मिती होईल असा अंदाज आहे.

#### ६.१.३. वहनातील तोटा

एमवायटी नियमावली, २०११मधील विनियम ४४.६ नुसार आरइन्फ्रा–जीने विद्युत निर्मिती प्रकल्प वापरीत असलेल्या सर्व प्रकारच्या कोळशावर – कच्चा, धुतलेला आणि आयात केलेला – जागेवर पाहोचेपर्यंतचा वहनातील तोटा ०.८% एवढा विचारात घेतलेला आहे.

#### ६.१.४. दुय्यम तेलाचा खप

आरइन्फ्रा–जीने दुय्यम तेलाचा खप, एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ४४.४ अनुसार १मिली/किवॅतास एवढा विचारात घेतलेला आहे.

#### ६.१.५. केंद्र उष्णता दर

आरइन्फ्रा–जीने डीटीपीएससाठी केंद्र उष्णता दर एमवायटी नियमावलीत नमूद केल्यानुसार विचारात घेतलेला आहे.

**ऊर्जा आकारांचे भाकीत**

### ६.२. इंधनाचा खर्च

आरइन्फ्रा–जी आयात केलेल्या आणि धुतलेल्या अशा दोन्ही कोळशांच्या किमती कोळसा–बाजारातील मागील आणि प्रचलित कल यांनुसार अपेक्षित धरीत आहे. आ.व. २०१५–१६साठीचा इंधनाचा खर्च ११६१.२५ कोटी रुपये वर्तविण्यात आलेला आहे.

**स्थिर आकारांचे भाकीत**

### ६.३. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, विद्युतनिर्मिती केंद्राने आ.व. २०१५–१६मध्ये ५१.६२ कोटी रुपयांचे भांडवलीकरण वर्तविलेले आहे, आणि या वर्षात उपलब्ध कालावधीत बहुतेक महत्त्वाच्या डीपीआर योजना अमलात आणल्या जातील.

### ६.४. डेट–इक्विटी गुणोत्तर

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३१ मध्ये भांडवली खर्चासाठीच्या योजनांना ७०:३० या प्रमाणात डेट–इक्विटी गुणोत्तरानुसार निधीपुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे. आ.व. १५–१६मध्ये विद्युतनिर्मिती व्यवसायात भांडवली खर्चासाठी कोणत्याही प्रकारचे वास्तविक कर्ज घेतलेले नसल्याने आरइन्फ्रा–जीने, आ.व. २०१५–१६च्या ट्रूईंग अपसाठी इक्विटीवरील परताव्याची आणि कर्जावरील व्याजाची गणना करण्यासाठी भांडवली खर्चाच्या योजनांचा नमुनेदार निधीपुरवठा ७०:३० या प्रमाणात विचारात घेतलेला आहे.

### ६.५. घसारा

मविनिआ एमवायटी नियमावली, २०११मध्ये वेगवेगळ्या मालमत्तांवरील घसाऱ्याच्या दरांसहित घसाऱ्याचे कोष्टक दिलेले आहे. आमचे असे म्हणणे आहे की, नियमावलीनुसार घसारा काढलेला केलेली आहे आणि त्याची गणना आ.व. २०१५–१६च्या जीएफएच्या मूळ पातळीवर तसेच वर्षभरात भर घातलेल्या मालमत्तेच्या आधारे केलेली आहे.

### ६.६. खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने खेळत्या भांडवलावलाची आवश्यकता आणि त्यावरील व्याजाची गणना मविनिआ एमवायटी नियमावलली, २०११मधील विनियम ३५.१ नुसार केलेली आहे, ज्यात वरीलप्रमाणेच खेळते भांडवल आणि त्यावरील व्याज यांच्यासहित तपशीलवार घटकांची तरतूद केलेली आहे.

### ६.७. कर्जाऊ भांडवलावरील व्याज

आ.व. २०१५–१६मध्ये भांडवलीकरण केलेल्या मालमत्तांसाठी ७०:३० असे नॉरमेटिव्ह डेट:इक्विटी गुणोत्तर आरइन्फ्रा–जीने, मविनिआ एमवाटी नियमावली, २०११नुसार विचारात घेतलेले आहे आणि अशा कर्जासाठीचा व्याजदर आ.व. २०१४–१५मध्ये प्रस्तावित असल्याएवढाच विचारात घेतलेला आहे.

### ६.८. इक्विटीवरील परतावा

मविनिआ नियमावलीमधील विनियम ३२.१मध्ये दरसाल १५.५% दराने, त्या–त्या वर्षाच्या सुरुवातीच्या इक्विटी बेसवर, समभाग भांडवलावरील परताव्याजी तरतूद आहे. आरइन्फ्रा–जीने आ.व. १५–१६च्या अनुज्ञेय सुरुवातीच्या इक्विटी बेसवरील परताव्याची गणना केलेली आहे.

### ६.९. प्रचालन आणि देखभाल खर्च

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, आव. २०१५–१६साठीचे प्रचालन आणि देखभाल खर्च वर्तविण्यासाठी ५ वर्षांमधील पॉईंट टू पॉईंट एस्कलेशन घटक विचारात घेतलेले आहेत आणि तेच आ.व. १४–१५च्या अंदाजांवर लागू केलेले आहेत. त्यानुसार आ.व. २०१५–१६साठी अंदाजित प्रचालन आणि देखभाल खर्च १४९.२६ कोटी रुपये एवढे आहेत.

### ६.१०. आयकर

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, एमवायटी नियमावली, २०११च्या विनियम ३४.१मध्ये असे नमूद केलेले आहे की, एआरआरसाठीचा आयकराला, सर्वात अलीकडील लेखापरीक्षित आर्थिक वर्षासाठी देय असलेल्या वास्तविक आयकरावर आधारित मान्यता देण्यात येईल. त्यानुसार आ.व. १५–१६साठीच्या आयकराची अंदाजित रक्कम या याचिकेत सादर केलेल्या आ.व. १३–१४साठी देय असलेल्या वास्तविक आयकराएढीच आहे.

### ६.११. प्रचलित दरपत्रकानुसार महसूल

आरइन्फ्रा–जीचे असे म्हणणे आहे की, विद्युतनिर्मिती केंद्रावर निर्माण केलेल्या विजेच्या विक्रीपासूनचा महसूल हा ऊर्जा आकाराच्या (अधिक एफएसी) दराने आणि माननीय आयोगाने २०१३च्या प्रकरण क्र.१मध्ये दिनांक १३ जून २०१३ रोजी दिलेल्या एमवायटी आदेशात मान्य केल्यानुसार आहे. त्यानुसार प्रचलित दरपत्रकानुसारचा अंदाजित महसूल १४४९.०१ कोटी रुपये एवढा आहे.

### ६.१२. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नाचे (एनटीआय) अंदाज आ.व. १३–१४च्या वास्तविक आकडेवारीवर, कोळशाच्या नाकारलेल्या विक्रीसह, आधारित आहेत. त्यानुसार आ.व. १५–१६साठीचे एनटीआय १७.७० कोटी रुपये अंदाजित केलेले आहे.

### ६.१३. आ.व. २०१५–१६साठी वार्षिक महसुलाचा आवश्यकता

आरइन्फ्रा–जी त्यांचा आ.व. २०१५–१६साठीचा वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश स्टँडअलोन तत्त्वावर पुढील तक्त्यात सादर करीत आहे आणि माननीय आयोगाला तो मान्य करण्याची विनंती करीत आहे.

**तक्ता ४: आ.व. २०१५–१६साठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (कोटी रुपयांमध्ये)**

| तपशील | मापनाचे एकक | आरइन्फ्रा–जी (सुधारित अंदाज) |
|---|---|---|
| इंधनाशी संबंधित खर्च | कोटी रु. | ११६१.२५ |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | कोटी रु. | १४९.२६ |
| घसारा | कोटी रु. | २६.८४ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | कोटी रु. | १८.३४ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | कोटी रु. | १६.८० |
| आयकर | कोटी रु. | २७.८६ |
| **एकूण महसुली खर्च** | कोटी रु. | **१४००.३५** |
| *अधिक: इक्विटीवरील परतावा* | कोटी रु. | ८८.८४ |
| *वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न* | कोटी रु. | १७.७० |
| **एकत्रित महसुलाची आवश्यकता** | कोटी रु. | **१४७१.४९** |

### ६.१४. आ.व. २०१५–१६साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता

आ.व. २०१५–१६साठी एकत्रित महसुलाची आवश्यकता, मागील महसुलातील तफावतीसह, माननीय एटीईच्या निकालाच्या परिणामांसह आणि आ.व. २०१४–१५च्या तात्पुरत्या ट्रूईंग तफावतीसह पुढील तक्त्यात सादर केलली आहे:

**तक्ता ५: एकत्रित महसुलाची आवश्यकता (रू. कोटी)**

| तपशील | मापनाचे एकक | आरइन्फ्रा–जी (सुधारित अंदाज) |
|---|---|---|
| इंधनाशी संबंधित खर्च | कोटी रु. | ११६१.२५ |
| प्रचालन आणि देखभाल खर्च | कोटी रु. | १४९.२६ |
| घसारा | कोटी रु. | २६.८४ |
| दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | कोटी रु. | १८.३४ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | कोटी रु. | १६.८० |
| आयकर | कोटी रु. | २७.८६ |
| **एकूण महसुली खर्च** | कोटी रु. | **१४००.३५** |
| *अधिक: इक्विटीवरील परतावा* | कोटी रु. | ८८.८४ |
| *वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न* | कोटी रु. | १७.७० |
| *अधिक: एटीई निकालाच्या परिणामस्वरूपी निर्माण झालेली तफावत* | कोटी रु. | २६५.१५ |
| *वजा: आ.व. १२–१३साठी आणि आ.व. १३–१४साठी कॅरिंग कॉस्टसहित महसुलातील अधिक्य* | कोटी रु. | –२०.१५ |
| *वजा: आ.व. १४–१५च्या ट्रूईंग अपमधील तात्पुरती अधिक्य* | कोटी रु. | –९०.४६ |
| **एकत्रित महसुलाची आवश्यकता** | कोटी रु. | **१६२६.०२** |

वरील तक्त्यात पाहिल्यानुसार आ.व. २०१५–१६साठीची वार्षिक महसुलाची आवश्यकता १६२६.०२ कोटी रुपये आहे, यात २०.१५ कोटी रुपये महसुलाची अधिक्य आणि २६५.१५ कोटी रुपयांचा एटीईच्या निकालाचा परिणाम समाविष्ट आहे. वरील म्हणण्याचा विचार करता, आरइन्फ्रा–जी सविनय सादर करीत आहे की, माननीय आयोगाने कृपया आ.व. २०१५–१६च्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेच मान्यता द्यावी.

### ६.१५. आ.व. २०१५–१६साठी दरपत्रक प्रस्ताव

आरइन्फ्रा–जीचे म्हणणे असे आहे की, एमवायटी नियमावली २०११ मध्ये विद्युतनिर्मिती कंपन्यांसाठी दोन भागात दरपत्रक दिलेले आहे: स्थिर आकार आणि ऊर्जा आकार. त्यानुसार, आ.व. २०१५–१६साठीची वार्षिक महसुलाची आवश्यकता पुढील तक्त्यात दर्शविल्यानुसार स्थिर आणि ऊर्जा आकार यांमध्ये वेगवेळी दिलेली आहे.

**तक्ता ६: आ.व. २०१५–१६साठी दरपत्रकाचा प्रस्ताव (रू. कोटी)**

| तपशील | मापनाचे एकक | आरइन्फ्रा–जी (सुधारित अंदाज) |
|---|---|---|
| वार्षिक स्थिर आकार (स्टँड अलोन) | कोटी रु. | ३१०.२४ |
| अगोदरच्या वर्षातील तफावतीमुळे स्थिर आकारांचे समायोजन | कोटी रु. | १५४.५३ |
| एकूण वार्षिक स्थिर आकार | कोटी रु. | ४६४.७७ |
| दरमहा स्थिर आकार | कोटी रु. | ३८.७७ |
| वार्षिक ऊर्जा आकार | कोटी रु. | ११६१.२५ |
| ऊर्जा आकारांचा दर | रु./किवॅतास | ३.०५ |

आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला विनंती करीत आहे की, कृपया आ.व. २०१५–१६साठीच्या वरील दरपत्रकाला मान्यता देण्यात यावी.